N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पालघर   **P.S.(ठाणे):** नालासोपारा   **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0191   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 04/06/2019 09:30 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार   **Date From (दिनांक पासून):** 03/06/2019

**Time Period (कालावधी):** पहर 6   **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/06/2019

**Time From (वेळेपासून):** 18:55 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 04/06/2019   **Time (वेळ):** 09:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 011   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/06/2019 09:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 0.50 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नालासोपारा पोलीस ठाणे ,गुन्हेप्रकटीकरण शाखेजवळ ,नालासोपारा पश्चिम

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** ज्ञानेश वसंत चौधरी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1982   (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**   **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 202 कासा टेरेजा बी विंग ,बालाजी हॉटेल जवळ ,वसई,नालासोपारा,पालघर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 202 कासा टेरेजा बी विंग ,बालाजी हॉटेल जवळ ,वसई,नालासोपारा,पालघर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पोउपनिरीसिध्देश सुरेश शिंदे | | | 1. A/201, स्काय हाइट्स,फोर्थ रोड श्रीप्रस्ता,नालासोपारा प ,नालासोपारा, पालघर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 10,000/ रुपये रोख रक्कम | 10,000.0 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 10,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि नं । 191-2019 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणेफिर्यादी नाव व पत्ता- ज्ञानेश वसंत चौधरी वय-37 वर्षे राहणार- 202 कासा टेरेजा बी विंग बालाजी हॉटेल जवळ वसई जि. पालघर मोनं 9518946275आरोपीत नाव व पत्ता - पोउपनिरी/सिध्देश सुरेश शिंदे नेमणुक- नालासोपारा पोलीस ठाणे राहणार- A/201, स्काय हाईटस फोर्थ रोड श्रीप्रस्ता नालासोपारा प ता. वसई जि. पालघर गु. घ. ता. वेळ व ठिकाण :-दि. 03/06/2019 रोजी 18.55 वाजता सूमारास नालासोपारा पोलीस ठाणे येथील गुन्हेप्रकटीकरण शाखेजवळ नालासोपारा पश्चिम ता.वसई जि.पालघरगु.मिळाला माल -10,000/- रुपये रोख रक्कम हकिकत :- ता.म वेळी व जागी यातील आरोपीत नाम लोकसेवक श्री सिध्देश सुरेश शिंदे वय-32 वर्षे नेमणुक- नालासोपारा पोलीस ठाणे जिल्हा पालघर राहणार-ए /201 स्काय हाईट, फर्थ रोड श्रीप्रस्था नालासोपारा प जि.पालघर यांनी त्यांना लोकसेवक या नात्याने मिळलेल्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करून फिर्यादी व फिर्यादी यांची पत्नी सौ प्रिया चोधरी यांचेविरुध्द दाखल असलेल्या गुन्ह्यात आम्हास अटक न करण्यासाटी व जामीन मिळण्यास गदत करण्याकरीत दिनांक 30/05/2019 रोजी फिर्यादी यांना पोलीस ठाण्यात बोलावुन फिर्यादीकडुन 60,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाचेच्या रुक्कमेपैकी 50,000/- रुपये फिर्यादीच्या मानलेला भाऊ श्री, सुभाष मयेकर यांचे मार्फतीने घेवुन दिनांक 03/06/2019 रोजी उर्वरित 10,000/- रुपये लाचेच्या रक्कमेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारुन स्वताचा आर्थिक फायदा करुन घेतला म्हणुन त्याच्याविरुध्द गुन्हा

Scanned by CamScanner

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): VASANT CHANDRAKANT LABDE(I (Inspector)) / PBMAH69388 **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे **Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): VASANT CHANDRAKANT LABC
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMAH69388



Scanned by CamScanner

फिर्याद नालासोपारा– दि. ०४/०६/२०१९

मी, ज्ञानेश वसंत चौधरी, वय ३७ वर्षे, रा. २०२, कासा टेरेजा, बी विंग,बालाजी हॉटेल जवळ, वसई, जि.पालघर, व्यवसाय–आयुर्वेदीक औषधाचे दुकान, मोबाईल क्र–९५१८९४६२७५ समक्ष हजर राहून फिर्याद देतो की,

मी वरील प्रमाणे असून वरील नमुद पत्त्यावर माझे कुंटुबासोबत राहत आहे. माझे आयुर्वेदीक औषधाचे दुकान असून मी त्यावर माझा उदनिर्वाह करतो.

माझे वाघोली गाव, वाघोली शाळा बस स्टॉप, नालासोपारा पुर्व येथे वडीलोपार्जीत घर असून ते घर भाडेकरू हाजरा पठाण यांना भाडयाने दिले होते. सदरचे घर मी कोर्टाचे आदेशाने खाली करुन घेतले होते. त्या गोष्टीचा मनात राग धरून हाजरा पठाण यांनी माझी पत्नी सौ. प्रिया व माझे विरूध्द नालासोपारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. त्या गुन्हयाचा तपास नालासोपारा पोलीस ठाण्याचे पोउपनिरी. श्री. सिध्देश शिंदे हे करीत आहेत. पोउपनिरी/श्री. शिंदे यांनी मला दिनांक ३०/०५/२०१९ रोजी पोलीस ठाण्यात बोलावुन अटक न करण्याकरीता व जामीन घेण्यास वेळ देण्याकरीता माझेकडे ६०,०००/रुपयाची मागणी करून आताच दे असे सांगितले व मला पोलीस ठाण्यात बसवून ठेवले. त्यावेळी मी माझे मानलेले भाउ श्री. सुभाष मयेकर यांचे मार्फतीने श्री. शिंदे यांना ५०,०००/रुपये दिले होते. त्यावेळी त्यांनी उर्वरित १०,०००/रुपये दिनांक ३१/०५/२०१९ रोजी घेवुन येण्यास सांगितले. परंतु मला पोउपनिरी. श्री शिंदे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी त्यांचे विरुध्द कारवाई होणेसाठी अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे येथे माझे स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार दिली होती.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ३१/०५/२०१९ व दि. ०१/०६/२०१९ रोजी दोन पंच साक्षीदार यांचे समक्ष पडताळणी करण्यात आली होती.

दिनांक ०२/०६/२०१९ रोजी पोउपनिरी/श्री. शिंदे यांनी माझा मोबाईल क्रमांक ९५१८९४६२७५ वर त्यांचा मोबाईल क्रमांक ९९६७८३७९३३ यावरुन फोन करुन दिनांक ०३/०६/२०१९ रोजी लाचेची रक्कम घेवून बोलवले. त्या अनुषंगाने दिनांक ०३/०६/२०१९ रोजी पोलीस उप अधीक्षक श्री. वाल्मीक पाटील, अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे यांचे सुचने प्रमाणे मी दोन पंचांसमक्ष पडताळणीकामी पोउपनिरी/श्री.शिंदे यांना त्यांचे मोबाईलवर फोन केला असता त्यांनी मला वसई कोर्ट येथे भेटण्यासाठी बोलाविले. त्याप्रमाणे मी पडताळणी कारवाई करीता पंच श्री. शेवाळे यांचेसह भेटण्यासाठी वसई कोर्ट येथे गेलो. परंतू पोउपनिरी/श्री. शिंदे हे मिळुन न आल्याने मी त्यांना पुन्हा त्यांचे मोबाईल वर संपर्क साधला असता त्यांनी मला नालासोपारा पोलीस स्टेशन येथे भेटण्यासाठी बोलाविले. त्याप्रमाणे मी पंच श्री.शेवाळे यांचे सोबत नालासोपारा पोलीस स्टेशन येथे आलो. तेथे पोउपनिरी/श्री.शिंदे यांची भेट घेतली त्यावेळी त्यांचेशी झालेल्या चर्चेत त्यांनी माझ्याकडे उरलेल्या १०,०००/–(दहा हजार) रुपयांच्या लाचेच्या रक्कमेची मागणी केली. मी ठरल्याप्रमाणे अवधी मागून घेतला व पडताळणी पथक ज्या ठिकाणी थांबले होते त्या ठिकाणी परत जावून घडलेली हकीकत पोलीस उप अधीक्षक श्री.पाटील व पंचाना सांगितली.

त्यानंतर वरील प्रमाणे लोकसेवक श्री.शिंदे यांनी लाचेची रक्कम मागितल्याचे निष्पन्न झाल्याने पोलीस उप अधीक्षक श्री.पाटील यांनी पुढील सापळा कारवाई करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे सापळा कारवाई करण्यात आली. सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक पोउपनिरी/श्री.शिंदे यांनी पुन्हा माझेकडे लाचेची रक्कमेची मागणी करुन आणलेली लाचेची रक्कम गुन्हे प्रकटीकरण

Scanned by CamScanner

शाखेमधील टेबलाच्या ड्राव्हरमध्ये ठेवण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी १०,०००/– रुपये लाचेची रक्कम पोउपनिरी/श्री. शिंदे यांचे सांगणेप्रमाणे टेबलाचे ड्राव्हरमध्ये ठेवली व ठरल्याप्रमाणे सापळा पथकास इशारा केला असता सापळा पथकाने त्यांना १८.५५ वाजता पंचासमक्ष पकडले आहे. सदरबाबत तसा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी यातील लोकसेवक पोउपनिरी/श्री. सिध्देश सुरेश शिंदे, वय–. ३२ वर्षे, नेमणुक–नालासोपारा पोलीस स्टेशन, जिल्हा पालघर, रा. अे/२०१, स्काय हाईट, फोर्थ रोड, श्रीप्रस्त, नालासोपारा प., जि.पालघर यांनी त्याना लोकसेवक या नात्याने मिळालेल्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन माझे व माझी पत्नी सौ. प्रिया चौधरी यांचेविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयात आम्हास अटक न करण्यासाठी व जामीन मिळण्यास मदत करण्याकरीता दिनांक ३०/०५/२०१९ रोजी मला पोलीस ठाण्यात बोलावून माझ्याकडे ६०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन लाचेच्या रक्कमेपैकी ५०,०००/– रुपये माझा मानलेला भाऊ श्री. सुभाष मयेकर यांचे मार्फतीने घेवून दिनांक ०३/०६/२०१९ रोजी उर्वरित १०,०००/– रुपये लाचेच्या रक्कमेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारून स्वत:चा आर्थिक फायदा करून घेतला. म्हणून माझी लोकसेवक पोलीस उप निरीक्षक श्री. सिध्देश सुरेश शिंदे, नेमणूक–नालासोपारा पोलीस स्टेशन, जि.पालघर यांचे विरुध्द फिर्याद आहे.

माझी फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखित करण्यात आली असून ती मला दाखविली. ती मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

ठाणे अमलदार
नालासोपारा पोलीस ठाणे

ही फिर्याद लिहून दिली.

Scanned by CamScanner